सकाळ

# थॅलेसेमिया आजाराची माहिती अभ्यासक्रमात समाविष्ट करा

## फाईट अगेन्स्ट थॅलेसेमिया संस्थेचे कुलगुरूंना निवेदन

कोल्हापूर, ता. १ : थॅलेसेमिया आजाराची माहिती अभ्यासक्रमात समाविष्ट करा, या मागणीचे निवेदन फाईट अगेन्स्ट थॅलेसेमिया संस्थेतर्फे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना दिले.

निवेदनातील माहितीनुसार, थॅलेसेमिया हा रक्तातील गंभीर अनुवंशिक आजार असून, या आजारातील रुग्णांच्या अंगात जन्मतःच रक्त तयार होत नाही. या मुलांना जगवण्यासाठी प्रत्येक १५ ते २१ दिवसांतून रक्ताची एक पिशवी चढवावीच लागते. फक्त जिल्ह्यात थॅलेसेमियाचे २५० तर महाराष्ट्रात १४००० पेक्षा जास्त रुग्ण आहेत. थॅलेसेमिया रुग्णाला पूर्णपणे बरे करण्यासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट शस्त्रक्रिया करण्यासाठी २५ ते ३० लाख रुपयांपर्यंतचा खर्च येतो. जो सामान्य कुटुंबांना परवडणारा नाही. दोन थॅलेसेमिया मायनर व्यक्ती विवाह बंधनातून एकत्र आल्यास होणारे अपत्य थॅलेसेमिया मेजर आजारग्रस्त जन्मू शकते. ज्याला नियमित रक्तसंक्रमण, औषधे, तपासण्यावर अवलंबून रहावे लागते. इतके करूनही थॅलेसेमिया रुग्णाचे सरासरी आयुष्य ३० पेक्षा जास्त असत नाही. काही ठराविक समुदायांमध्ये जवळील नात्यांमध्ये विवाह लावले जातात. त्यातून अनुवंशिकतेने दोन थॅलेसेमिया मायनर एकत्र येण्याची शक्यता असते. विवाह करताना दोन थॅलेसेमिया मायनर एकत्र येऊ नयेत, यासाठी विवाहपूर्व तपासणी करणे गरजेचे आहे. महाविद्यालयातील तरुण-तरुणींना थॅलेसेमियाची माहिती अभ्यासक्रमातूनच झाल्यास ते थॅलेसेमिया मायनरची विवाहपूर्व तपासणी करून घेतील. थॅलेसेमिया आजाराविषयी समाजात जनजागृती होण्यास मदत होईल.

संस्थेचे अध्यक्ष धनंजय नामजोशी, सचिव उमेश पाटील, उपसचिव डॉ. ऋषिकेश पोळ उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी लवकरच संबंधित विषयाच्या प्राध्यापक, डॉक्टरांशी चर्चा करून थॅलेसेमिया विषय विद्यार्थ्यांपर्यंत कशाप्रकारे पोहोचवायचा याबाबत निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले.



कोल्हापूर : फाईट अगेन्स्ट थॅलेसेमिया संस्थेतर्फे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना निवेदन देताना सदस्य.

तरुण भारत

# सकारात्मक विचारांसह चिकाटी महत्वाची

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन



**आदर्श विद्यार्थीनी पुरस्कार राजलक्ष्मी कदम हिला देताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, डॉ. तेजस्विनी मुडेकर, कदम कुटुंबिय.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

जीवनात यश मिळवण्यासाठी सातत्याने अभ्यास केला पाहिजे. स्वत:वर विश्वास ठेवून योग्य निर्णय घ्या. संशोधन कार्याची तपश्चर्या करा. सकारात्मक विचाराबरोबर चिकाटीने अभ्यास केल्यास जीवनाचा मार्ग सुखकर होईल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

कमला कॉलेजमधील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. सचिव प्राजक्त पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, विद्यार्थीनींकडून हार्ड वर्क करून घेवून त्यांना यशाच्या शिखरावर नेवून पोहचवण्याचे काम महाविद्यालय करीत आहे. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील आदर्श विद्यार्थीनी पुरस्कार शुभांगी घराळ हिला देण्यात आला. कमला कॉलेज आदर्श विद्यार्थीनी राजलक्ष्मी कदम हिला सॉर्ड ऑफ ऑनरचा पुरस्कार मिळाला. सूत्रसंचालन डॉ. निता धुमाळ यांनी केले. प्रा. रेखा पंडीत यांनी आभार मानले. यावेळी डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अनिल घस्ते, डॉ. पाटील, प्रा. स्वाती कांबळे, डॉ. सुनिता काळे, प्रा. एच. व्ही. पुजारी, प्रा. वर्षा साठे, प्रा. ए. एम. साळोखे, आदी उपस्थित होते.

लोकमत

# खोत गौरव ग्रंथाचे रविवारी प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ.नमिता खोत गौरव ग्रंथाचे आणि ग्रंथालयातील नावीन्यपूर्ण उपक्रम व सेवा या ग्रंथाचे प्रकाशन रविवारी (दि. ५) होणार आहे.

विवेकानंद महाविद्यालयाच्या डॉ.बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के प्रमुख पाहुणे असून, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या डॉ.शुभांगी गावडे अध्यक्षस्थानी असतील. भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.मोहन खेरडे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन होईल.

0 2 JUN 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# काश्मीर विद्यापीठात 'स्तुति' उपक्रमाची सांगता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकारातून श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात आयोजित 'स्तुति' प्रशिक्षण उपक्रमाची बुधवारी (दि. २९ मे) यशस्वी सांगता झाली. शिवाजी विद्यापीठ आणि केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय यांच्या सहयोगातून दि. २३ ते २९ मे या कालावधीत श्रीनगरच्या काश्मीर विद्यापीठात स्तुति प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. सात दिवसांच्या या प्रशिक्षण कार्यक्रमात दीडशे प्राध्यापक व विविध संस्थांतील संशोधक, विद्यार्थी सहभागी झाले.

प्रशिक्षणात १४ प्राध्यापकांनी अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरणांच्या तांत्रिक बाबी आणि वापराच्या अनुषंगाने २६ मार्गदर्शनपर व्याख्याने दिली. शिवाजी विद्यापीठातर्फे सैफ-सीएफसी विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी मार्गदर्शन केले. आधुनिक उपकरणांचा जम्मू-काश्मिरी भागातील संशोधक व औद्योगिक क्षेत्रांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमांतर्गत गुलमर्ग येथील अत्याधुनिक प्रयोगशाळेस क्षेत्रीय भेट देण्यात आली. या भेटीत लाईटिंग प्रेडिक्शन या विषयावर व्याख्यान आणि प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमाच्या सांगता समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीनगर एनआईटीचे संचालक प्रा. राकेश सेहगल, काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. निलोफर खान, भौतिकशास्त्र विभागप्रमुख बशरत वांत, स्तुति प्रशिक्षण उपक्रमाचे चेअरमन प्रा. फराक मीर उपस्थित होते.

तरुण भारत

# काश्मीर विद्यापीठात 'स्तुती' उपक्रमांची सांगता




श्रीनगर येथे स्तुती उपक्रमाच्या सांगता समारंभात काश्मीर विद्यापीठ कुलगुरू डॉ. निलोफर खान यांच्यासोबत प्रा. सेहगल, प्रा. आर. जी. सोनकवडे.

- दीडशे संशोधकांनी घेतला लाभ
- १४ तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकारातून श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठात आयोजित 'स्तुती' प्रशिक्षण उपक्रमाची यशस्वी सांगता झाली. या उपक्रमाचा दीडशे संशोधकांनी लाभ घेतला.

शिवाजी विद्यापीठ आणि केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय यांच्या सहयोगातून २३ ते २९ मे या कालावधीत श्रीनगरच्या काश्मीर विद्यापीठात 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. सात दिवसांच्या या प्रशिक्षणात दीडशे प्राध्यापक व विविध संस्थांतील संशोधक, विद्यार्थी सहभागी झाले. प्रशिक्षणात १४ तज्ज्ञ प्राध्यापकांनी अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरणांच्या तांत्रिक बाबी आणि वापराच्या अनुषंगाने व्याख्याने दिली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सैफ-सीएफसी विभागाचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी सैफ-सीएफसीमध्ये उपलब्ध विविध अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरणांचे प्रकार, तांत्रिक बाबी, मूलभूत तत्त्वे, वापरण्याच्या पद्धती तसेच औद्योगिक क्षेत्रांसाठीचे त्यांचे उपयोजन याविषयी मार्गदर्शन केले. या आधुनिक उपकरणांचा जम्मू-काश्मिरी भागातील संशोधक व औद्योगिक क्षेत्रांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यासाठी 'सृष्टी' वेब पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन नोंदणी व इतर संबंधित प्रक्रियेची माहितीही दिली. या उपक्रमांतर्गत गुलमर्ग येथील अत्याधुनिक प्रयोगशाळेस क्षेत्रीय भेट देण्यात आली. नोबेल पारितोषिक विजेते प्रा. ए. एच. कॉम्प्टन यांनी या प्रयोगशाळेत काम केले होते. या भेटीत लाईटिंग प्रेडिक्शन या विषयावर व्याख्यान आणि प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमाच्या सांगता समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीनगर एनआईटीचे संचालक प्रा. राकेश सेहगल, काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू श्रीमती डॉ. निलोफर खान, भौतिकशास्त्र विभागप्रमुख बशरत वांत, स्तुति प्रशिक्षण उपक्रमाचे चेअरमन प्रा. फराक मीर आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# लावणी अन् भांगड्याने जिंकली प्रेक्षकांची मने

- महाराष्ट्राची लोकधारा अंतर्गत विविध कलाविष्कार
- महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग कार्यक्रमाची सांगता

प्रतिनिधी
कोल्हापूर

गौरव समारंभानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले गोव्याचे दिवाळी नृत्य आणि महाराष्ट्राच्या पारंपरिक लोकधारेच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. लावणी आणि पंजाबी भांगडा नृत्याने कार्यक्रमाची शोभा वाढवली. प्रेक्षकांनी जल्लोषी वातावरणात टाळ्या-शिट्ट्यांनी दाद दिली.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात दिवाळी या गोव्याच्या पारंपरिक लोकनृत्याने झाली. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'आझादी' हे प्रहसन (लघुनाटिका) सादर केले. स्वातंत्र्याचा अर्थ आणि महत्त्व त्यांनी याद्वारे अधोरेखित केला. एक लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने भारतीय वाद्यवृंद सादर केला. या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र व पंजाबसह ईशान्य भारत, पश्चिम बंगाल, आसाम, राजस्थान, गुजरात, ओडिशा आदी राज्यांतील लोकसंगीताच्या विविध छटांचे दर्शन घडविले.

'महाराष्ट्राची लोकधारा' या अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने भूपाळीपासून ते वासुदेव नृत्य, शेतकरी नृत्य, कोकणचे बाल्या नृत्य, मंगळागौर, भारूड, धनगरी नृत्य, वाघ्या-मुरळी, जोगवा, गोंधळ, कोळीनृत्य अशा महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरांचे सादरीकरण करीत प्रेक्षकांची मने जिंकली. पंजाबच्या संघाने शहीद भगतसिंगांच्या जीवन संदेशावर आधारित एकांकिका सादर केली. प्रतीक सिंह आणि गणेश चिंचकर यांनी अप्रतिम नक्कल सादर केली. पंजाब व कोल्हापूरच्या विद्यापीठांनी संयुक्तपणे देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम सादर केला. या गीतांनी सभागृहातील वातावरण पूर्णतः राष्ट्रभक्तीमय होऊन गेले. लावणी व भांगडा या नृत्यांवर उपस्थितांनी ठेका धरला होता. डॉ. नीलेश सावे आणि हितेंद्र सिंग यांनी यांनी सूत्रसंचालन केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

**आम्ही कोल्हापूरच्या प्रेमात पडलो**

शिवाजी विद्यापीठाचा हिरवागार निसर्गरम्य परिसर आणि कोल्हापुरी पाहुणचार यांच्या आम्ही प्रेमात पडलो आहोत. येथील समृध्द जैवविविधता आणि खाद्यसंस्कृती अत्यंत आवडली, अशा शब्दात पंजाबच्या विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त केल्या.




कोल्हापूर : महाराष्ट्राची लोकधारा अंतर्गत लोकनृत्य सादरीकरण करताना शिवाजी विद्यापीठचे विद्यार्थी.